# गोमंतकीय शिमगोत्सव
## एक अवलोकन

श्री. प्रकाश पर्येकर
धावें–तार, सत्तरी – गोवा

गोव्याच्या लोकमानसात शिमगोत्सवाला वेगळे असे स्थान आहे. गोमंतकाच्या वेगवेगळ्या भागात साजरा होणाऱ्या शिमगोत्सवाचे स्वरूप वरचेवर पहायला एक असं दिसलं तरी त्याला तरी त्याला विविध कंगोरे आहेत. समुद्रकिनारी परिसरात साजरा होणारा शिमगोत्सव आणि डोंगराळ भागात साजरा होणारा उत्सव अनोखा असाच आहे.

गोव्यात पोर्तुगीज १५१० साली आले. त्यांनी १५४३ नंतर धर्मांतरणाला सुरुवात केली. बार्देश, तिसवाडी आणि सासष्टी येथील हजारोंच्या संख्येने लोकांनी खिस्ती धर्मात प्रवेश केला. तदूनंतर सन १५६० मध्ये पोर्तुगीज सरकारने आपल्या सत्तेखाली आलेल्या गोमंतकात 'इन्क्वीजिशन' म्हणजे धर्मसमीक्षण ट्रायब्युनलची स्थापना करण्यात आली. या कायद्याचे स्वरूप भयानक होते. खिस्तधर्म स्वीकारलेल्या लोकांनी हिंदूधर्माशी असलेले सर्व प्रकारचे संबंध तोडले पाहिजेत. हिंदूदेवदेवता, सण–उसव, चालीरिती, परंपरा या सर्वांवर बंदी घालण्यात आली होती. जो कोण आपल्या परंपरा जोपासत आहेत त्यांना कठोर शिक्षा व्हायची. त्यांचे हात तोडले जायचे. 'उज्या आगट्यात' म्हणजे पेटत्या होमकुंडात जिवंत जाळलं जायचं.



वा ! वा ! किती आनंद झाला !

ज्यांनी धर्मांतरण केलं नव्हतं त्यांना अन्य प्रांतात हाकलून दिलं होतं. यावेळी हजारो हिंदूलोक आपल्या देवदेवतांना घेऊन पेडणे, डिचोली, फोंडा आणि इतर भागांत स्थलांतरित झाले होते.

गोव्यातील नवखिश्चनांना त्यांच्या मूळ संस्कृतीपासून तोडण्याचा, गोमंतकातील हिंदूसंस्कृती नश्ट करण्याचा प्रयत्न इन्क्वीझिशनमुळे करण्यात आला हे खरं असलं तरी आपण माणसाचा धर्म बदलू शकतो पण त्याची संस्कृती मात्र पूर्णपणे बदलूशकत नाही. धर्म आणि संस्कृती एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. धर्म आणि संस्कृती एक दिसल्या तरी त्या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. इथे मला एक महत्त्वाची गोष्ट आपल्याला सांगायची आहे ती म्हणजे जुन्या काबिजादीत राहणाऱ्या नवखिस्त लोकांची. या लोकांनी जुन्या परंपरा अजूनही पूर्णपणे सोडलेल्या नाहीत. पूर्वाश्रमीच्या हिंदुत्वाची लक्षणे, त्या मूळ संस्कृतीचे बीजघटक हा खिस्त समाज गोव्याच्या काही भागात अजून मिरवतो आहे. सालसेत, सांगे, केपे आणि अन्य तालुक्यात हल्लीपर्यंत खिस्ती लोक 'मांडावर' जाऊन शिमगोत्सव खेळायचे. त्यांच्यात अजूनही लग्नपरंपरा, कौल घेणे, प्रसाद लावणे, आंगवण करणे अशा काही हिंदू परंपरा चालूआहेत. खिस्ती गावड्यांच्या बायका धालोत्सव साजरा करतात. शिमगा हा लोकोत्सव त्या समाजात 'इंत्रुज' या नावाने फेब्रुवारीत साजरा होतो. डोंगरी गावच्या हिंदूधर्माच्या इंत्रुजला 'घणचे

कटर घण ऽऽ... कट ऽऽ घणऽऽ' असा ढोल–ताशांचा आवाज घुमूलागताच मन ही ताल धरू लागते. डोंगरी हा कृष्णंभट्ट बांदकरांचा गाव. तिथे इंत्रुजच्या मांडावर सुवारीवादन होते. ओऽऽसय.. च्या गजराने डोंगरी गाव अत्यानंदीत होतो. एका बाजूला कदंबकालीन चांदोर (चंद्रपूर)चा मुसळनाच डोळ्याचे पारणे फेडतो तर दुसऱ्या बाजूने खिस्ती आणि हिंदूधर्माचे प्रतीक असलेला शिवोली बार्देशचा 'जागर' (लोकनाट्य) आपल्या मूळ परंपरेची आठवण करून देतो.

इतिहासात डोकावून पाहिल्यास गोव्याचे सर्व खिस्ती बांधव हे मुळचे हिंदूआणि ते तसे असल्या कारणामुळे 'घुमट' हे गोमंतकीय वाद्य दोन्हीही समाजामध्ये पाहायला मिळते. पण या लोकांवर झालेल्या खिस्त धर्माच्या संस्कारामुळे कला सादरीकरणाच्यावेळी त्यात वेगळेपण असणं हे साहजिकच आहे.

गेल्या फेब्रुवारी महिन्यता कार्यक्रमाच्या निमित्ताने मी कर्नाटकातल्या उडुपीनजीक असलेल्या 'कुंदापूर' या ठिकाणी गेलो होतो. तेथे कोकणी–कुंणबी लोकांची भेट झाली. हे लोक काणकोण तालुक्यातल्या श्री मल्लीकार्जून देवाचे उपासक आहेत. तोच आपला कुळदेव आहे असं त्यांचं म्हणणं. हे लोक आपल्या गावात शिमगोत्सव साजरा करतात. त्यांच्याकडे होळी खेळण्याची प्रथा आहे. होळीच्या दिवशी हे लोक रंगीबेरंगी कपडे परिधान करतात व पूर्ण डोके अबोलीच्या फुलांनी सजवतात. घुमटवाद्य गळ्यात घालून ते वाजवत बेधुंद नाचतात. केरळ राज्यातल्या एर्नाकुलम जिल्ह्यातल्या कोचीन, चेंरोय, तिपूर्णीतुरा आणि इतर ठिकाणी राहणारा मूळ गोमंतकीय कुणबी समाज आपल्या इथे होळी उत्सव साजरा करतो. तसेच कोची–मट्टांचेरी इथे होळी उत्सवाला तिथे स्थायिक झालेला मूळ गोमंतकीय वैश्य आणि सारस्वत समाज श्री भगवती देवळाच्या अंगणात 'गोडे रामायण' गाऊन नाचतात. सत्तरी तालुक्यात व इतर ठिकाणी जशी 'जत' हा लोकगीत प्रकार गायला जातो तशाच प्रकारे केरळला वरील लोकगीत सादर करतात.

शिमगा किंवा शिगमो या शब्दाची उत्पत्ती काय? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडणे साहजिकच आहे. मराठीतले लोकसाहित्यातले अभ्यासक रा. चिं. ढेरे लिहितात. 'देशीनाममालेत हेमचंद्राने या उत्सवाला 'सुगिम्हज' म्हणजे सुग्रीष्मक असे नाव दिले आहे. या नावापासून शिमगा (मराठी) तर शिगमो (कोकणी) हा शब्द प्रचलीत झाला आहे, असे अभ्यासकांचं मत आहे.

काही लोकप्रकार काळाच्या ओघात लुप्त होतात. गोव्याचा 'पेरणी जागर' हे त्याचं एक उत्तम उदाहरण आहे. शिमगोत्सव या सणाचे लौकीक स्वरूप लोप पावले नसून ते वर्षानुवर्षे अधिक गडद व कलात्मक पद्धतीने आविष्कृत होत अहे. 'जगोन वाचोन उल्लों जाल्यार फुडल्या वर्सा शिगमो खेळचेलो' असं म्हणून ग्रामीण भागातला एखादा वयोवृद्ध माणूस थोडी दारू घोटतो आणि बेधुंदपणे शिमगा नाचायला घराबाहेर पडतो. यावेळी त्याला स्वत:चे भान राहत नाही. तळहाताला फोड येईपर्यंत तो घोल बडवतो आणि नाचतो.




शिमगोत्सवाला जिवंतपणा आहे तो कशामुळे? त्याचं शक्तीस्थळ कुठं आहे? मला वाटत शिमगोत्सवाचा 'अं:स्वर' हेच त्याचं महत्वाचं शक्तीस्थळ आहे. कारण शिमगोत्सवात वाद्य आहे. गीत–संगीत आहे. नृत्य आहे. या सगळ्या कलांचा एकत्रित मिलाफ असल्याकारणामुळे सर्वसामान्य माणूस त्याच्यापासून दूर जाऊच शकत नाही. शिमगो ही समूहाची निर्मिती असल्या कारणाने त्याला तो हवाहवासा वाटूलागतो.

जुन्याकाळी आमच्याकडे गुलालाची उधळण नसायची. त्याच्याऐवजी असायची ती 'धुळवड'. ढोल आणि ताशांच्या तालावर शेकडोंच्या संख्येने तरुण तसेच वयोवृद्ध मंडळी पाय दुखेपर्यंत नाचायची. नाचताना जमिनीवरची 'धुल्ल' म्हणजे धूळ वर यायची. हीच ती धुळवड...आता तिची जागा गुलालाने घेतली आहे.

फाल्गुन महिला हा उत्साहाचा आणि आनंदाचा महिना. याच महिन्यात शिमगोत्सव येतो. या काळात सगळा परिसरच फुलून गेलेला असतो. परसातली अबोली आणि रानात मिळणारी उसकीची फुलं या शिमग्याला प्रिय...या दोन्ही फुलांना गंध नाही. मला वाटतं शिमग्याला गंध नाही आवडत...त्याला आवडतो तो रंग...रंगाने तो न्हाऊन जातो. निसर्गातले विविध रंग आणि मनातले तरंग यांच्या मिलनाने माणसाचे अंतरंग खुलून जाते.

अंत्रुज तसेच तिसवाडी तालुक्यात शिमगा फाल्गुन शुक्ल नवमीला सुरू होऊन तो पुनवेला संपतो, तर उत्तर गोव्यात पेडणे,

**रणमाले...**



तालगडी...

डिचोली, सत्तरी आणि काही इतर ठिकाणी तो पुनवेला सुरू होऊन गुढीपाडव्यापर्यंत चालतो. पर्ये–सत्तरी येथे गुढीपाडव्याच्या दिवशी 'देवाचे न्हावण' केले जाते. त्याच दिवशी वेगवेगळ्या 'वाड्याचे' रोंबट मेळ निघायचे आणि त्यांची सांगता श्री भूमिका देवीच्या मंडपात होत असे.

शिमग्याला 'मांड' हा महत्वाचा. मांड म्हणजे देवाची पवित्र जागा. देवतेचे किंवा दैवतांचे निवास असलेले ठिकाण. ठरलेल्या दिवशी गांवकरी मांड ठेवतात. प्रमुख मांडकरी, मांडाचे वांगडी एकत्र जमतात व मांडाच्या विधी करतात. शिमग्याचे देवकृत्य या मांडावर होते.

गोमन्तकात शिमगोत्सव साजरा करण्याचा काळ त्या–त्या परिसराप्रमाणे थोडाफार बदलतो. तसेच त्याच स्वरूपसुद्धा वेगळे पहायला मिळते. सांगे तालुक्यातील नेत्रावळी, बांदवाडा येथील कुंकळ्ळी समाजातील शिमग्यात 'हाणपेट' हा उत्सव साजरा होतो. त्याचा हा शिमगोत्सव फाल्गुन शु. दशमीला सुरू होतो आणि होळीच्या दुसऱ्या दिवशी संपतो. तालगडी, तोणयामेळ, गोफ हे या उत्सवाचे प्रमुख आकर्षण होय. तसेच शिमगा संपताच होते ती 'मलकाजाणची जात्रा' ही जात्रा शिमग्याचाच एक भाग आहे.

आमच्या सत्तरीसारख्या भागात संपन्न होणारा शिमगा म्हणजे विविध लोकप्रकाराचा ठेवा आहे. इथे होळीच्या दुसऱ्या दिवशी चोरोत्सव (पानाचे चोर) साजरा केला जातो. तिसऱ्या व चौथ्या दिवशी 'रोंबट'. काही गावात चौथ्या दिवशी 'करवल्या' असतात. पांचव्या दिवशी घोडेमोडणी. गावाप्रमाणे शिमग्याचे दिवस ठरवलेले असतात. या शिमगोत्सवात रोंबटाचे ते दोन दिवस खूपच महत्वाचे असून, त्या दिवशी 'सोंग' घेऊन 'अल्लख' मागण्याची तसेच रोंबट घेऊन आलेल्यांना 'तळी' देण्याची परंपरा आहे. सोंग घेऊन येणारी व्यक्ती पौराणिक, ऐतिहासीक व सामाजिक विषयावर आपली कला पेश करते. आपल्या कुशल अभिनयाने तो लोकांचे मनोरंजन करते.

पूर्वी सत्तरीत 'खेळ' व्हायचे. इथे खेळ म्हणजे पौराणिक किंवा काल्पनीक कथानक असलेले नाटक. दशावतारी नाटकाप्रमाणेच या नाटकाची संहिता नसायची. वाचू–लिहून शकणारा उमदा लोककलाकार मोठ्या उत्साहाने या खेळात सहभागी व्हायचा. इथे स्त्री पात्र मात्र पुरुषच करायचा. राधानाच, करवल्या आणि रणमालेसारख्या लोकप्रकारात स्त्रियांचा सहभाग पहायला मिळत नाही. मी केलेल्या निरीक्षणात गोव्यात कुठल्याही हिंदूलोककला प्रकारात स्त्री आणि पुरुष एकत्रित नृत्य करीत नाहीत. शिमगोत्सवात अल्लख मागायला 'गौरीचा बाळ' घेऊन लहान मुली गावात दारोदारी फिरतात. हे सोडलं तर महिलावर्गाला शिमगोत्सवात स्थान नाही.

गोमन्तकातला शिमगा बेधुंद होऊन नाचतो. गळापडेपर्यंत गातो...हात दुखायला लागेपर्यंत वाजतो आणि पाय दुखेपर्यंत खेळतो....आमच्या या शिमग्याला ढोल, तासा आणि कांसाळे ही प्रमुख वाद्ये लागतात. काही भागात वेगवेगळ्या लोकनृत्यासाठी घुमट, झांज, मृदंग, हार्मोनियम, तसेच तबल्याचा वापर केला जातो.

कबाडकष्ट करून थकलेल्या शेतकऱ्याचा हा शिमगोत्सव. त्याच्या मनात कलात्मक अभिव्यक्ती इथे पहायला मिळते. पण आज संपूर्ण जीवन यंत्रवत होत चालले आहे. शिक्षणाचा प्रसार, विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे झालेल्या बदलामुळे आज माणूस आपल्या पारंपरिक सणा–उत्सवाकडे डोळेझाक करीत आहे. पण शिमगोत्सव हा आज राज्यपातळीवर साजरा करण्यात येत असल्यामुळे ग्रामीण भागातले लोक आता स्पर्धेच्या निमित्ताने का होईना विविध लाकेप्रकार सादरीकरण होत आहेत. काळाप्रमाणे लोकवेदात बदल हा घडतच असतो. पण स्पर्धेच्या निमित्ताने एखाद्या कलाप्रकारात मुद्दामहून बदल घडवून आणणे बरोबर नव्हे. बदल हा सहज आणि नैसर्गिक झाला पाहिजे. याचे भान लोककलाकाराने ठेवल्यास बरे होईल.

गोव्यातले कित्येक असे लोकप्रकार काळाच्या पडद्याआड जात आहे. अशावेळी लोककलाकारांनी जागरुक राहून तो लोकप्रकार पुनर्जिवीत केला पाहिजे. अशावेळी संवर्धन, संकलन आणि संशोधन या तीन 'स'ची आम्ही जोपासना केली पाहिजे. आमच्या वाड–वडिलांनी आमच्यापर्यंत आणून दिलेला लोकसंस्कृतीचा हा ठेवा आम्ही सर्वांनी नव्या तरुणपिढीकडे विश्वासाने देऊन त्यांच्यातला आत्मविश्वास वाढवला पाहिजे. हे काम आपल्या सर्वांचे आहे.